ARTHA, Poona 4
Tel. 55627

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

# अर्थ

162642

वर्ष ३४ | पुणे बुधवार ३ जानेवारी, १९६८ | अंक १




## आमचे ग्राहक, आणि नाराज ?

छे: ! आम्ही बेळगाव बँकेतील कर्मचारी आमच्या ग्राहकांना केव्हाही नाराज होऊच देत नाही; मग त्यांचे आमच्याकडे कसल्याही प्रकारचे काम असो ! महाराष्ट्र व म्हैसूर राज्य आणि गोवा येथील आमच्या ३८ शाखांच्यामार्फत आपले कोणत्याही प्रकारचे बँकिंगचे काम करण्यास आम्ही तत्पर आणि उत्सुक आहो. तुमचा आमच्याशी व्यवहार म्हणजे उभयतांना पूर्ण समाधान !

# दि बेळगाव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३० )

**आपल्या नजीक असलेल्या आमच्या शाखेला आजच भेटा.**

मुंबई शाखा : नरसीनाथ स्ट्रीट, मांडवी, मुंबई ९.

---

स्थापना १९४५

टेलिफोन नं. ३५६५०२

# वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

## ७, तात्या घारपुरे पथ, मुंबई—४.

( १ ) बचत खाते :—व्याजाचा दर : दरसाल दर शे. रु. ४ - ००
( २ ) खास बचत योजना :—घरी बसून पैसे भरता येतात
( ३ ) कायम ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर
( ४ ) महाराष्ट्र, म्हैसूर आणि गुजरात राज्यांतील प्रमुख शहरांवर डिमांड ड्राफ्ट उपलब्ध

**खेळते भांडवल सुमारे १३ लाख रुपये**

अधिक माहितीसाठी अवश्य भेटा :—

बा. य. वेलींकर
असि. मॅनेजर

---

पिठाच्या चक्क्या



भिडे अँड सन्स प्रा. लि. सांगली
महाराष्ट्र राज्य

---

पुण्यांत याल तेव्हां—
उद्यान निवास



या नवीन, आधुनिक आकर्षक व सर्वकष निवासामध्येंच कुटुंबासमवेत रहाण्यास या. माफक दर

टेलीफोन ५७७९१ (माहिती मागवा) उद्यान प्रासाद स्काउट ग्राउंड समोर, पुणे २

# ★ अर्थ ★

बुधवार, ३ जानेवारी, १९६८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति । — कौटिलीय अर्थशास्त्र*

---

## "अर्थास" ३४ वे वर्ष लागले

"अर्था"ची स्थापना १९३५ मध्ये कै. प्रोफेसर वा. गो. काळे ह्यांनी केली आणि त्याला आता ३४ वे वर्ष सुरू झाले आहे. आर्थिक अभ्युदयाचे महत्त्व महाराष्ट्रीय जनतेला पटवून देण्याचा प्रयत्न "अर्थ" सतत करीत आला आहे. सामाजिक आणि शैक्षणिक उन्नतीचा पाया आर्थिक आणि औद्योगिक उत्कर्ष हाच आहे. उद्योगाखेरीज उच्च रहाणीची अपेक्षा बाळगणे व्यर्थ आहे. आर्थिक आणि औद्योगिक प्रगतीला शास्त्रीय ज्ञान-साधनेचे महत्त्व किती मोठे आहे, हे कोयनानगर धरणीकंपाने दाखवून दिलेले आहे. शास्त्रशुद्ध विचारसरणी आणि त्याला अनुरूप कृती ह्या बाबतीत नव्या वर्षात थोडे तरी पुढे पाऊल पडो !

---

## बँकांवरील सामाजिक नियंत्रणाची जरूरी तपासा

नाग-विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संघटनेतर्फे सेंट्रल बँक ऑफ इंडिआचे जनरल मॅनेजर श्री. व्ही. सी. पटेल ह्यांचा सत्कार करण्यात आला. स्वागत-समारंभ प्रसंगी बोलताना श्री. पटेल म्हणाले की, हिंदमध्ये व्यापारी बँकांवर सामाजिक नियंत्रण घालण्याची जरूरी आहे काय ह्या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी सरकारने कमिशनची नेमणूक करावी. देशाच्या अर्थव्यवस्थेचे रक्षण करण्याच्या कामी बँकिंगच्या धंद्याने काय कामगिरी केली आहे त्याची चौकशी कमिशनने करावी. नि:पक्षपाती आणि वस्तुनिष्ठ अभ्यासापोटी अशा नियंत्रणाची आवश्यकता सिद्ध झाली तर मात्र ते अमलात आणण्यात यावे. गेल्या वर्षापासून बँकांच्या ठेवीत घट होत चालली आहे ही चिंतेची बाब आहे. गेल्या वर्षी बँकांकडील ठेवी ४४ कोटी रुपयांनी घटल्या. चालू वर्षी त्या ७० कोटी रुपयांनी घटल्या आहेत. ह्या परिस्थितीकडे सरकारने लक्ष दिले पाहिजे. वस्तूंच्या वाढत्या किंमती आणि ठेवींवरील व्याजातून उगमातच कर कापून घेण्याची नवी पद्धत ह्यांचा हा परिणाम असावा. १९५५ साली व्यापारी बँकांजवळील ठेवी २५० ते ३०० कोटी रुपयांच्या घरात होत्या. आज त्या ३,५०० कोटी रुपयांच्या जवळपास आहेत. हिंदी बँकांनी अलीकडील काही काळात परदेशांशी होणाऱ्या धंद्यातही स्थान मिळविले आहे. १९५५ साली शेतीच्या व्यवसायाला दिलेल्या कर्जात घट झाली असे म्हणता येणार नाही. त्या सालापूर्वी चहाच्या व इतर मळ्यांना देण्यात आलेली कर्जे शेतीसाठी दिलेली समजण्यात येत. परंतु १९५५ साली रिझर्व्ह बँकेने ही कर्जे शेती उद्योगधंद्यासाठी दिलेली अशी धरण्यास प्रारंभ केला. त्यामुळे शेतीला दिलेल्या कर्जांची टक्केवारी घटलेली दिसू लागली.

---

## यांत्रिक हत्यारांच्या मागणीत घट

बंगलोर येथील हिंदुस्थान मशीन टूल्स कारखान्याचा १९६६–६७ सालचा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला आहे. ह्या कारखान्याच्या ४ ठिकाणी शाखा आहेत. बंगलोरशिवाय हरियानामधील पिंजोर, केरळमधील कळमसरी आणि आंध्रमधील हैद्राबाद ह्या ठिकाणी त्या स्थापन केलेल्या आहेत. हिंदमधील मंदीचा परिणाम इंजिनिअरिंगच्या उद्योगधंद्यात विशेष जाणवत आहे. हिंदुस्थान मशीन टूल्स कारखानाही त्यातून सुटलेला नाही. कारखान्याच्या सर्व शाखांची जेवढी उत्पादनक्षमता आहे तिच्या ६० टक्के क्षमता वापरता येण्याइतक्याच मागण्या अहवालाच्या वर्षी कारखान्याकडे नोंदण्यात आल्या. मंदीचा परिणाम होऊन कारखान्याला आपल्या उत्पादनात घट करावी लागली आणि विस्ताराच्या काही योजनाही सोडून द्याव्या लागल्या. मंदीची झळ लागू नये म्हणून कारखान्याने काही उपायांची योजना केली आहे. कारखान्यात नव्या प्रकारची यांत्रिक हत्यारे तयार करण्यास प्रारंभ होत आहे. त्याचप्रमाणे छापखान्याची यंत्रेही तयार करण्यात येत आहेत. अंतर्गत उपायांबरोबरच परदेशी निर्यात करण्याचे प्रयत्नही होत आहेत. १९६६ च्या ऑक्टोबरमध्ये निर्यात वाढविण्याच्या दृष्टीने फ्रँकफुर्ट आणि न्यूयॉर्क ह्या ठिकाणी दोन कचेऱ्या उघडण्यात आल्या. ५१ यांत्रिक हत्यारांची परदेशीय मागणी अहवालाच्या वर्षी नोंदण्यात आली. त्यामागील वर्षात नोंदलेल्या यंत्रांच्या मागण्या पुऱ्या करावयाच्या होत्या. दोन्ही मिळून ७६ यांत्रिक हत्यारे निर्यात करण्यात आली आणि त्यामुळे ३०·१२ लाख रुपयांच्या परदेशीय चलनाची प्राप्ती झाली. मागील वर्षात एकूण ७३ यंत्रांची निर्यात करून १७·८५ लाख रुपयांचे परदेशीय चलन मिळविण्यात आले होते.

---

## कै. प्रा. द. गो. कर्वे

सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ आणि "अर्था"चे सल्लागार प्रा. द. गो. कर्वे ह्यांचे दि. २८ रोजी हृदयविकाराने अकस्मात् निधन झाले. आम्ही त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खांत सहभागी आहो.

# बँकांचे सामाजिक नियंत्रण करणारे बिल
## लोकसभेत दाखल

बँका सामाजिक नियंत्रणाखाली आणण्यासाठी करण्यात येणाऱ्या कायद्याचे बिल लोकसभेत दाखल करण्यात आले आहे. ह्या बिलाचे नाव 'बँकिंग लॉज (अमेंडमेंट) बिल, १९६७' असे आहे. १९४९ चा बँकिंग रेग्युलेशन कायदा ह्या बिलाने दुरुस्त केला जाईल, त्याचप्रमाणे स्टेट बँक आणि रिझर्व्ह बँक कायदेही दुरुस्त केले जातील.

भारताच्या आर्थिक विकासाला पोषक आणि नियोजित वाढीला साहाय्यभूत असाच बँकांचा कारभार चालावा, विकासाला आवश्यक त्या अग्रतेने बँकिंगजवळील द्रव्य वापरले जावे, विशिष्ट व्यक्ती आणि गट ह्यांनाच त्याचा लाभ मिळत राहू नये, असे बिलाच्या उद्देशात म्हटले आहे.

ह्या उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी, डायरेक्टर बोर्डावरील सभासदांत शेती, ग्रामीण अर्थव्यवस्था, लघु उद्योग, सहकार, बँकिंग, कर्ज-पुरवठा, इत्यादींचे खास ज्ञान किंवा अनुभव असणाऱ्या व्यक्तींची बहुसंख्या राहावयाची आहे.

शेती, लघु उद्योग किंवा सहकार ह्यांचे प्रतिनिधित्व करणारे किमान दोन तरी डायरेक्टर बँकेच्या बोर्डात असतीलच. ही अट बँकेकडून पुरी करण्यात आली नाही, तर रिझर्व्ह बँक बोर्डाची पुनर्घटना सक्तीने घडवून आणू शकेल.

पूर्ण वेळ देणाऱ्या चेअरमनचे कोणत्याही कंपनीत किंवा फर्ममध्ये विशेष हितसंबंध असता कामा नयेत. त्याची नेमणूक प्रत्येक वेळी पाच वर्षांकरिता होईल आणि त्याची नेमणूक, त्याला काढून टाकणे, ह्याला रिझर्व्ह बँकेची पूर्व संमती लागेल.

जो डायरेक्टर रिझर्व्ह बँकेने नेमलेला असेल, तो इतर अनेक बँकांत डायरेक्टर असला तरी चालेल. सर्व व्यापारी बँकांवर योग्य असे डायरेक्टर नेमण्यात येणारी अडचण त्यामुळे दूर होईल.

सध्या डायरेक्टरांना व त्यांच्या फर्म्सना तारण नसलेली कर्जे देता येत नाहीत; ह्यापुढे कोणत्याही प्रकारची कर्जे देता येणार नाहीत. सध्या दिलेली कर्जे कर्जाच्या करारांतील मुदतीत परत करण्यात आली पाहिजेत. जेथे मुदत सांगितलेली नाही, तेथे ती कायदा अमलात येण्याच्या तारखेपासून तीन वर्षांच्या आत फेडली गेली पाहिजेत.

## नवे वर्ष

नव्या वर्षास नव्या समस्यांनी प्रारंभ होईल; समस्यांची भीती बाळगू नका. समस्या आहेत म्हणूनच जीवनाला काहीतरी अर्थ आहे. फक्त मेलेल्यांनाच समस्या नसतात. समस्यांशी झगडण्याने आपले सामर्थ्य वाढत जाते आणि आपला आत्मविश्वास दृढतर होतो.

—जवाहरलाल नेहरू

बँकिंगविषयक धोरण आणि सार्वजनिक हित ह्यासाठी रिझर्व्ह बँक डायरेक्टरांची नेमणूक करू शकेल. सध्याही रिझर्व्ह बँक अशी नेमणूक करू शकते, पण त्याचा उद्देश बँकिंग कंपनीचे किंवा तिच्या ठेवीदारांचे हितसंवर्धन, एवढाच मर्यादित आहे.

बँकेच्या पतीला बाधक होईल अशा रीतीने बँकिंग कंपनीच्या कामात अडथळा आणणे, निदर्शने करणे, आरडाओरडा करणे, ह्यास बंदी केली जाईल. गुन्हेगाराला सहा महिने कारावास किंवा १,००० रु. दंड अशी शिक्षा सांगितली आहे.

रिझर्व्ह बँकेच्या सूचना एखाद्या बँकेने पाळल्या नाहीत, अथवा ठेवीदारांच्या हिताच्या, बँकिंगच्या धोरणाच्या, किंवा कर्जपुरवठ्याच्या दृष्टीने तसे जरूरीचे वाटले तर ती बँक सरकार आपल्या ताब्यात घेऊ शकेल.

व्यापारी बँकांना लागू असणाऱ्या ह्या सर्व तरतुदींतून सहकारी बँका मुक्त आहेत.

रिझर्व्ह बँकेच्या इश्यू खात्यात असलेले सोने अवमूल्यनानंतरच्या चालू 'पॅरिटी' दराने हिशेबात दाखविण्याचा अधिकार रिझर्व्ह बँकेला देण्यात आला आहे. (हा अधिकार वापरल्यावर, चलनी नोटांचे तेच तारण जास्त रकमेचे दिसू लागेल.) त्याचप्रमाणे, इश्यू खात्यातील रोखे बाजारभावापेक्षा कमी दराने दाखविण्याचाही रिझर्व्ह बँकेला अधिकार राहील.

स्टेट बँकेला १२ महिन्यांपेक्षा जास्त मुदतीची कर्जे देण्याचा अधिकार प्राप्त होईल.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## मध्यवर्ती मंत्र्यांचा वीज व पाण्यावरील खर्च

मध्यवर्ती सरकारच्या ५४ मंत्र्यांपैकी २६ मंत्री वीज व पाण्यासाठी दरमहा २०० रुपयांपेक्षा अधिक खर्च करतात अशी माहिती अधिकृत रीत्या देण्यात आली आहे. हा खर्च त्यांच्या वैयक्तिक गरजांसाठी होतो. निवासस्थानातच कामकाजाची काही जागा असेल तर त्याचा खर्च निराळा करण्यात येतो. मंत्र्यांच्या पगाराबद्दल व भत्त्याबद्दल १९६२ चा कायदा आहे. त्यातील तरतुदीप्रमाणे मंत्र्यांवर वीज व पाण्यावरील खर्चासंबंधी मर्यादा नाही. तथापि अशा तऱ्हेने मोफत मिळणाऱ्या वीज व पाण्याचा आकार दरसाल २,४०० रुपयांपेक्षा अधिक होऊ नये असे बंधन मंत्र्यांनी स्वतःवर घालून घेतलेले आहे. त्यापेक्षा अधिक खर्च झाल्यास तो स्वतःच्या खिशातून करण्याचे त्यांनी ठरविलेले आहे. घरगुती वापरासाठी होणाऱ्या विजेच्या व पाण्याच्या खर्चाचे काही मंत्र्यांचे आकडे असे आहेत. गृहमंत्री श्री. चव्हाण ह्यांचा दरमहाचा सरासरी खर्च रु. ५५० म्हणजे सर्वांत अधिक आहे. त्याशिवाय सरकारी कामासाठी होणारा दरमहाचा सरासरी खर्च रु. ३१८ आहे. तोही इतर मंत्र्यांपेक्षा अधिक आहे. त्यानंतर श्री. फक्रुद्दिन अली महमद ह्यांचा अनुक्रम लागतो. त्यांचा दरमहाचा सरासरी खर्च ५०० रुपयांपेक्षा थोडा कमी आहे. इतर काही मंत्र्यांचे सरासरी खर्चाचे आकडे : श्री. दिनेशसिंग रु. ४५९, श्री. रघुरामय्या रु. ४२६, डॉ. चंद्रशेखर रु. ४१९. श्री. अशोक मेहता ह्यांचा खर्चाचा आकडा बराच कमी म्हणजे दरमहा ७५ रुपये आहे. सर्वांत कमी खर्च श्रीमती सरोजिनी महिषी ह्यांचा आहे. सरकारी कामाबद्दलच्या दरमहाच्या सरकारी खर्चाच्या बाबतीत श्री. मोरारजी देसाई ह्यांचा अनुक्रम श्री. चव्हाण ह्यांच्यानंतर लागतो. त्यांचा हा खर्च दरमहा २६७ रुपये आहे.

---

## आक्रमणाची कायदेशीर व्याख्या करण्याचा प्रयत्न

पहिल्या महायुद्धाच्या वेळी युद्धमान देश लढाई सुरू करण्यापूर्वी एकमेकांस निर्वाणीचे खलिते पाठवीत असत. दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभी व तत्पूर्वीही नाझी जर्मनीने अचानक आक्रमण करण्याचे तंत्र अमलात आणले. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या कालात कोरिया, भारत–चीन, भारत–पाकिस्तान, इस्राईल–अरब ह्यांच्यात सशस्त्र संघर्ष झाले पण प्रत्येक वेळी आक्रमण कोणी केले हा प्रश्न अनिर्णीतच राहिला. आता संयुक्त राष्ट्रसंघटनेने आक्रमणाची कायदेशीर व्याख्या करण्यासाठी ३५ सदस्यांची एक कमिटी स्थापन केली आहे. संघटनेच्या पुढील अधिवेशनात ही व्याख्या सादर करण्यात यावयाची आहे. सदस्यांपैकी १४ सदस्य आशिया व आफ्रिका खंडांतील असतील. ५ सदस्य पूर्व युरोप देशातील आणि बाकीचे पश्चिम युरोप व पश्चिम गोलार्धातील असतील.

---


समाजशिक्षणमालेचे प्रकाशन

**आपली चलनी नोट**

लेखक : श्री. श्री. वा. काळे. संपादक 'अर्थ'

किंमत ५० पैसे. २०–२–६७ रोजी प्रसिद्ध झाले.





# भारतातील प्रमुख २०० कंपन्या

## विक्रीत १४% वाढ; नफ्यांत ५% घट

इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्या इकॉनॉमिक अँड सायंटिफिक रिसर्च फाउंडेशनने केलेल्या पाहणीप्रमाणे, भारतातील प्रमुख मोठ्या कंपन्यांची वाढ होत असली, तरी किफायतशीरपणा कमी होत चालला आहे. २०० कंपन्यांच्या १९६५ बाबतच्या पाहणीचा हा निष्कर्ष आहे. ह्या वर्षी त्यांची विक्री २,६१३ कोटी रु. होती ती १९६५ मध्ये २,९९८ कोटी रु. झाली म्हणजे ती १४% ने वाढली. पण त्यांचा निव्वळ नफा ५% ने उतरला. १९६४ मध्ये तो १२१ कोटी रु. होता, तो १९६५ मध्ये ११५ कोटी रु. झाला. पब्लिक सेक्टर मधल्या कंपन्या प्रायव्हेट सेक्टरमधील कंपन्यांचे मानाने खूपच विस्तार पावत आहेत, पण नफ्याचे बाबतीत त्यांची परिस्थिती निराशाजनक आहे. जिंदगीवर सुटलेल्या नफ्याच्या कसोटीवर, पब्लिक सेक्टरमधील एकही कारखाना पहिल्या दहात येऊ शकला नाही. पहिल्या दहा कंपन्या, त्यांच्या विक्रीच्या आकड्यांप्रमाणे, खालीलप्रमाणे आहेत. हिंदुस्थान स्टील ( २०५ कोटी रु. ), इंडियन आयर्न ( ७९ कोटी रु. ), इंडियन ऑइल ( ७६ कोटी रु. ), हिंदुस्थान लिव्हर ( ७१ कोटी रु. ), एम एम टी सी ( ६८ कोटी रु. ), टेल्को ( ६६ कोटी रु. ), इंपीरिअल टोबॅको ( ५९ कोटी रु. ), दिल्ली क्लॉथ मिल्स ( ५२ कोटी रु. ), आणि ए. सी. सी. ( ५२ कोटी रु. ).

जगातल्या इतर देशांतील मोठ्या कंपन्यांच्या मानाने भारतातील मोठ्या कंपन्या लहानच आहेत. भारताची सर्वात मोठी कंपनी, हिंदुस्थान स्टील, ही अमेरिका, ब्रिटन, जर्मनी, फ्रान्स, जपान ह्या देशांतील पहिल्या वीस कंपन्यांच्याही खाली जाईल. फक्त फ्रान्समध्ये तिचा अनुक्रम १३ वा लागेल.

भारतातील प्रमुख वीस कंपन्यांनी मिळून २६३ कोटी रु. किंमतीच्या मालाची म्हणजे १९६५ मधील एकूण निर्गतीच्या ३५% मालाची निर्गत केली. त्यापैकी एक तृतीयांश ( ९६ कोटी रु. ) निर्गत कपास कापडाच्या गिरण्यांनी केली. त्या-खालोखाल मायनिंग ( २६ कोटी रु. ) आणि इंजिनिअरिंग ( १२ कोटी रु. ) कंपन्यांचा अनुक्रम लागतो.

२०० कंपन्यांच्या यादीत बँका, विमा कंपन्या, इनव्हेस्टमेंट कंपन्या, इत्यादींचा विचार केलेला नाही. ११ ते २० अनुक्रमाच्या कंपन्या येणेप्रमाणे आहेत :—डनलॉप रबर, एसो स्टँडर्ड रिफायनिंग, स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन, व्होल्टास, हिंदुस्तान मोटर्स, प्रीमिअर ऑटोमोबाईल्स, सेंचरी स्पिनिंग अँड मॅन्युफॅक्चरिंग, गेस्ट कीन विल्यम्स, फर्टिलायझर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया आणि इंडिया ट्यूब.

---

### इनकम टॅक्स लपविणारे फिल्म स्टार्स

देव आनंद, राजकपूर, राजेन्द्रकुमार, शम्मी कपूर आणि वहिदा रेहमान ह्या पाच प्रमुख फिल्म स्टार्सनी आपले उत्पन्न लपवून इनकम टॅक्स चुकविल्याचे उघडकीस आले आहे. राजकपूरकडून ८०,००० रुपये सक्तीचा अवलंब करून वसूल करावे लागले; इतरांनी आपले देणे बिनबोभाट देऊन टाकले.

गेल्या पाच वर्षात १,००,००० रुपयांपेक्षा जास्त प्राप्ती असणाऱ्या नट-नट्यांची यादी अर्थ खात्याचे उपमंत्री श्री. के. सी. पंत ह्यांनी दिली आहे, त्यांत काही नामवंतांची नावे नाहीत, हे पाहून आश्चर्य वाटेल. गेल्या पाच वर्षात सर्वात जास्त इनकम टॅक्स ( ११·५४ लक्ष रु. ) राजकपूरने भरला आहे.

| नाव | १९६३-६४ | १९६४-६५ | १९६५-६६ | १९६६-६७ | १९६७-६८ |
|---|---|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. | रु. | रु. |
| सुनील दत्त | ४९,०८८ | ३०,८९१ | ५८,१३० | ४३,३५० | — |
| आशा पारेख | ६६,४०१ | ७०,३१९ | ७८,३३३ | ६८,४६० | ४४,४६६ |
| सैरा बानू | ३२,६२९ | २६,००७ | — | — | — |
| राजेन्द्रनाथ | १३,१५७ | २२,८२१ | २७,२८४ | ३४,९७७ | — |
| देव आनंद | १,५८,१९६ | १,६२,३७९ | २,१६,०६३ | — | — |
| शम्मी कपूर | १७,३८० | १,२०,७२३ | ३,२८,१४५ | १,३१,६७५ | ४९,९०९ |
| शशी कपूर | ७,०७८ | १०,३५२ | १५,६७२ | ३३,९६० | १४,५७८ |
| राज कपूर | ४,८७,६७९ | — | ११,५४,१३४ | ७५,६०४ | — |
| राजेन्द्र कुमार | १,६१,६८२ | १,३९,०५८ | ५,५८,८९५ | १,६७,३४१ | ३,४६,७२३ |
| धर्मेन्द्र | १३,०५१ | १४,७८७ | ८७,०२३ | १,३३,३१९ | ९५,६९९ |
| मनोज कुमार | १३,९६८ | २३,२२७ | ३३,९६१ | ७३,०३३ | ३६,३८६ |
| वहिदा रेहमान | १,४०,८३४ | ८२,४२२ | ९६,४८९ | १,४०,७०० | — |

### ग्राहकोपयोगी माल बनविणारे सहकारी कारखाने

मध्यवर्ती सरकारच्या सहकार खात्याने ग्राहकोपयोगी माल बनविणारे सहकारी तत्त्वावर चालविण्यात येणारे कारखाने स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. सहकारी विभागात अशा कारखान्यांची उभारणी करण्यात आल्यास, ग्राहकांच्या सहकारी संस्थांना मालासाठी खाजगी कारखानदारांवर आणि व्यापाऱ्यांवर अवलंबून राहावे लागणार नाही. निदान मालाच्या खरेदीत घासाघीस करण्याची शक्ती त्यांना अधिक लाभेल असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. संकल्पित कारखान्यांची उभारणी ग्राहकांच्या सहकारी संस्थामार्फत झाली तर ग्राहकांना चांगल्या दर्जाचा माल पुरविणेही शक्य होईल. शिवाय देशात उत्पादन होणाऱ्या ग्राहकोपयोगी मालांत सहकारी संघटनांमार्फत उत्पादन होणाऱ्या मालाचे प्रमाणही त्यामुळे वाढेल. त्याचा परिणाम म्हणून सहकारी संघटनांचे उत्पन्न वाढून त्यांची आर्थिक शक्तीही वाढेल आणि स्पर्धा करण्याच्या बाबतीत त्या अधिक समर्थ होतील. ग्राहकोपयोगी माल निर्माण करणाऱ्या सहकारी संस्था उभारण्याचा कार्यक्रम तयार करण्यात आला आहे. सहकारी उद्योगधंद्यांत पुढील काही धंद्यांचा समावेश करण्यात आला आहे: मसाले कुटण्याचा धंदा, कॉफीची पूड करण्याचा धंदा, धुण्याचा साबण, वह्या, स्टेशनरीचे सामान, इत्यादी वस्तू तयार करण्याचे धंदे. त्याशिवाय लोकांना नेहमी लागणाऱ्या सोयी पुरविण्याच्या सहकारी संस्थाही स्थापन करण्यात यावयाच्या आहेत. त्यांत घरगुती वापरात असणाऱ्या विजेच्या उपकरणांची दुरुस्ती करणाऱ्या संस्थांचा समावेश आहे. ग्राहकोपयोगी माल बनविणाऱ्या सहकारी संस्था व शेती सहकारी संस्था ह्यांच्या सहकार्याने अन्नपदार्थांवर संस्करण करणाऱ्या संघटनाही उभारता येतील.

---

### अमेरिकेकडून मिळणाऱ्या मदतीत कपात

अमेरिकेकडून परदेशांना मिळणाऱ्या मदतीत अमेरिकन काँग्रेसने बरीच कपात केली असल्याने पाकिस्तान आणि भारत ह्यांना मिळणाऱ्या मदतीत घट होण्याचा संभव आहे. गेल्या आर्थिक वर्षात कोणत्याही प्रकल्पाशी निगडित नसलेली अशी ३८·२ कोटी डॉलर्सची मुक्त मदत भारताला देण्यात आली होती. रुपयाच्या चलनात ह्या मदतीची रक्कम २८६ कोटी रुपये होते. चालू आर्थिक वर्षात मदतीची रक्कम २८ कोटी डॉलर्स अथवा २१० कोटी रुपयांपर्यंत कमी होण्याची शक्यता आहे. अशाच प्रकारची पाकिस्तानला मिळणारी मदतही २० कोटी डॉलर्सवरून १४ कोटी डॉलर्सपर्यंत घसरणे शक्य आहे. भारत व पाकिस्तान ह्या देशांना इतर देशांकडून होणाऱ्या मदतीइतकी मदत स्वतः देण्याचेही अमेरिका नाकारील असे दिसते.

---

### विवाह करतानाच त्याच्या विच्छेदाची तरतूद

औद्योगिक समाजातील माणसामाणसातील बहुतेक नाती कायदेशीर करारावर आधारलेली असतात. अर्थातच अशा समाजात विवाह हा सुद्धा एक करारच मानला गेलेला आहे. करार म्हटला की त्याचे पालन करण्याची जबाबदारी कराराने बद्ध झालेल्या उभय पक्षांवर येते. काही कारणाने विवाहाचा करार मोडण्याची पाळी आल्यास कोर्ट-दरबार करावा लागतो आणि उभयपक्षी द्रव्याची हानी आणि मनःस्ताप सोसावा लागतो. ही अडचण टाळण्यासाठी अमेरिकेतील एका स्त्रीरोगतज्ज्ञाने अशी सूचना केली आहे की लग्नाचा दाखला देतानाच त्यात काडीमोडीसंबंधीचे एक कलम घालण्यात यावे. त्याच्या सूचनेप्रमाणे विवाहबद्ध पतिपत्नींनी बँकेत तीन खाती उघडावी. त्यापैकी एक पतीच्या नावाचे, दुसरे पत्नीच्या नावाचे आणि तिसरे संयुक्त असावे. पतिपत्नींनी काडीमोड घेण्याचे ठरविल्यास त्यासंबंधीचा खर्च दोघांनी निम्मेनिम करावा. त्यासाठी आपल्या स्वतंत्र खात्यातून अगर संयुक्त खात्यातून उचल करावी. संयुक्त खात्यातील रकमेचा भरणा अर्थातच दोघांनी करावा. प्रचलित कायद्याप्रमाणे विवाहविच्छेदन करताना येणाऱ्या व्यावहारिक अडचणींची तरतूद करण्याचा हेतू ह्या सूचनेमागे आहे. न्यूयॉर्कमधील स्त्रियांच्या संघटनांनी विवाहविच्छेदाची तरतूद करणाऱ्या ह्या सूचनेचे स्वागत केले आहे. विवाहाच्या वेळीच त्याच्या विच्छेदाची तरतूद करणे अनिष्ट आहे अशी टीका करण्यात येते. तिला सूचकाने दिलेले उत्तर सत्याला धरून आहे. विवाह झाल्यानंतरच्या जीवनाची खरी कल्पना त्यामुळे विवाहेच्छू तरुणांना येईल, आणि वैवाहिक प्रेमाचा खोटा मुलामा त्यांना सहज आकर्षित करू शकणार नाही असा सूचकाचा अभिप्राय आहे.

---

### कापडाच्या नियंत्रित किंमती वाढविण्यास नकार

इंडियन कॉटन मिल्स फेडरेशनने नियंत्रित दराने विकल्या जाणाऱ्या कापडाच्या किंमती १६ टक्क्यांनी वाढविण्याची मागणी मध्यवर्ती सरकारकडे केली होती. परंतु ती अमान्य करण्यात आली आहे. सध्या कापडाच्या एकूण उत्पादनापैकी सुमारे ४० टक्के कापड नियंत्रित दराने विकण्यात येत असते. गेल्या एप्रिलमध्ये ह्या प्रकाराच्या कापडाच्या किंमती १५ टक्क्यांनी वाढवून देण्यात आल्या होत्या. तेव्हापासून उत्पादनाच्या खर्चात झालेली वाढ भरून काढण्यासाठी फेडरेशनने वरील मागणी केली होती. कापसाच्या किंमतीवरील नियंत्रणे काढून टाकण्यात येऊन गिरण्याना खुल्या बाजारात कापसाची खरेदी करण्याची परवानगी देण्यात आली होती. खुल्या बाजारातील कापसाच्या किंमती नियंत्रित किंमतीपेक्षा अधिक असल्याने गिरण्यांचा कापूसखरेदीवरील खर्च वाढला आहे असे गिरण्यांचे म्हणणे आहे.

---

## ज्योतिष आणि वैद्यक ह्यांचा निकटचा संबंध

भौतिक शास्त्राच्या ज्ञानाचा परिचय झाल्यापासून हिंदी समाजातील अनेक परंपरागत ज्ञानशाखांवरील लोकांचा विश्वास उडू लागला आहे. तथापि अडचणीत सापडल्यावर ज्योतिष शास्त्राकडे धाव घेण्याची वृत्ती शिक्षितांतही अजून दिसून येते. बंगलोर येथे निघणाऱ्या ज्योतिष शास्त्राच्या मासिकाचे संपादक श्री. बी. व्ही. रामन ह्यांनी ज्योतिषशास्त्राची तरफदारी निराळ्या पद्धतीने केली आहे. बंगलोर येथील जागतिक सांस्कृतिक संस्थेच्या विद्यमाने बोलताना ते म्हणाले की अलीकडे सूर्यावर होणाऱ्या घडामोडी आणि त्यांचे पृथ्वीवरील सजीव व निर्जीव सृष्टीवर होणारे परिणाम ह्यांच्याविषयी बरेच संशोधन झालेले आहे. ह्या संशोधनातील माहितीवरून पृथ्वीवरील अनेक प्रकारच्या घटनांवर सूर्याचा परिणाम होतो हे सिद्ध झालेले आहे. मनुष्य हा जीव रासायनिक प्रक्रियेच्या आधाराने विकास पावलेला उच्च कोटीचा जीव असल्याने सूर्यावरील घडामोडीचा त्याच्यावर परिणाम होणे अपरिहार्य आहे. अगदी जडवादी शास्त्रज्ञांना सुद्धा ज्योतिष आणि वैद्यक ह्यांच्यांतील परस्परसंबंध मान्य करावा लागला आहे. ह्यात आश्चर्य करण्यासारखे काही नाही. अगदी प्राचीन काळापासून भारतीय वैद्यांना ज्योतिषशास्त्राचा अभ्यास करावा लागत असे. एखाद्या रोगाचे निदान करताना रोग्याच्या पत्रिकेतील ग्रहमान लक्षात घेतले तर फायदा होतो असे त्यांना आढळून आले. रोग्याच्या जन्माच्या वेळी त्याची ग्रहस्थिती जशी असेल त्याप्रमाणे त्याच्या प्रकृतीत आणि अंगभूत प्रवृत्तीत फरक पडतो. रोग्यांची तात्कालिक तपासणी करण्यामुळे त्याला झालेल्या विकृतीचे अचूक निदान पुष्कळदा करता येत नाही.

---

## स्कूटर्सच्या उत्पादनावर परिणाम

हिंदमध्ये स्कूटर्स, मोटारसायकली आणि तीन चाकांच्या मोटारी ह्यांचे उत्पादन करण्याची जितकी क्षमता आहे त्यापैकी निम्मीही क्षमता आज वापरली जात नाही. कारण, ही वाहने वापरण्यासाठी ज्या अनेक गोष्टी लागतात त्यांचा पुरेसा पुरवठा नाही. म्हणून वाहनांचे उत्पादनच कमी करावे लागत आहे. ह्या वाहनांना लागणाऱ्या टायर्स व ट्यूबची टंचाई असल्याने दिल्लीमधील एका मोटार सायकलच्या कारखान्याला आपले उत्पादन कमी करून कामगारांना कमी करण्याची पाळी येणार असे दिसते. कारखान्याची वार्षिक उत्पादनक्षमता १५,००० गाड्यांची आहे. पण, त्याचे उत्पादन मात्र ७,००० पर्यंत खाली घसरले आहे. देशात आज २॥ लाख वाहनांना मागणी आहे. परंतु टायर्स-ट्यूबच्या अभावी त्यांची निर्मिती धोक्याची होत चालली आहे.

---

## केरळ राज्य राजस्थानला स्त्री-डॉक्टर्स पाठविणार

प्रगत देशांशी तुलना करता भारतामधील डॉक्टर्सची संख्या लोकसंख्येच्या मानाने कमी आहे. त्यातही डॉक्टर्स शहरांत व्यवसाय करण्यास अधिक उत्सुक असतात. ग्रामीण भागात त्यांची गरज असूनही ते खेडोपाडी जाण्यास अनेक कारणांमुळे तयार नसतात. त्यामुळे मद्राससारख्या काही राज्यात डॉक्टर्सची संख्या गरजेच्या मानाने अधिक आहे. रोगपरिहाराच्या कार्याबरोबरच कुटुंबनियोजनाचे कार्यही अलीकडे डॉक्टर मंडळींना करावे लागते. राजस्थानसारख्या काही राज्यांतून डॉक्टर्सचा तुटवडा असल्याने राज्याच्या आरोग्यमंत्र्यांनी मद्रास व केरळ राज्यांच्या सरकारांकडे डॉक्टर्सची मागणी केली होती. राजस्थानच्या आरोग्यखात्यात काम करण्यासाठी निदान १०० स्त्री-डॉक्टरांची तातडीची गरज आहे. मद्रास सरकारकडून राजस्थान सरकारला अद्याप काही कळविण्यात आलेले नाही, परंतु केरळ राज्य सरकारने पुढील वर्षाच्या फेब्रुवारीपर्यंत ५० स्त्री-डॉक्टर्स राजस्थानला पाठविण्याचे कबूल केले आहे. त्यांना मुख्यतः कुटुंबनियोजन विभागात काम करावे लागणार आहे. स्त्री-डॉक्टर्सना केरळ राज्यात प्रारंभी दरमहा ५०० रुपये वेतन देण्यात येते. त्यांना जर दरमहा ७०० रुपये देऊ करण्यात आले आणि इतर काही सवलती देण्यात आल्या तर त्या राजस्थानमध्ये जाण्यास तयार होतील, असे केरळ सरकारने कळविले आहे. राजस्थान सरकारने ह्या व्यवस्थेस कबुली दिलेली आहे. केरळशिवाय मद्रासमधील काही स्त्री-डॉक्टर्सही राजस्थानात जाण्यासाठी तयार होतील असा अंदाज आहे. डॉक्टर्सच्या ह्या निर्यातीमुळे संबंधित राज्यांना फायदाच होईल ह्यांत शंका नाही.

---

## बेल्जमचे भारताला कर्ज

बेल्जम आणि भारत ह्यांच्यात झालेल्या कराराप्रमाणे बेल्जम भारताला १२.५ कोटी फ्रँक्सचे कर्ज देणार आहे. डॉलर्सच्या चलनात कर्जाची किंमत २.०५ कोटी डॉलर्स होते. कर्जावर तीन टक्क्यांनी व्याजाची आकारणी करण्यात येणार असून त्याची फेड १५ सारख्या वार्षिक हप्त्यांनी करावयाची आहे. पहिली ५ वर्षे मात्र कर्जफेड माफ करण्यात आलेली आहे. भारत-मदत संघाने शिफारस केल्याप्रमाणे बेल्जमने भारताला दिलेले हे दुसरे कर्ज आहे. भारत-मदत संघाने भारताची अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी आपद्प्रसंगीची म्हणून खास मदत देण्याचे आवाहन संघातील सभासदांना केलेले आहे. आवाहनाला साद म्हणून बेल्जमने १९६६-६७ च्या आर्थिक वर्षासाठी ६ कोटी फ्रँक्सचे कर्ज ह्यापूर्वी दिलेले आहे.

---

## दीड रुपयाचे जुने खोके दीडशे रुपयांना

स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन नायलॉन धाग्यांची आयात करते व असोसिएशनमार्फत विणकरांना त्यांचा पुरवठा करते. ज्या पॅकिंगमध्ये नायलॉन भरलेले असते त्या मोकळ्या खोक्यांना मोठ्या प्रमाणावर मागणी येत आहे. चोरून व जकात चुकवून आयात केलेले नायलॉन विकता येण्याकरता व्यापारी वर्ग आयात झालेली मोकळी खोकी वापरू लागले आहेत व आपला चोरटा व्यापार लपवू लागले आहेत. त्यामुळे नायलॉनबरोबर आयात झालेली खोकी भरमसाठ किमतीला विकत घेतली जाऊ लागली आहेत. मोकळ्या खोक्याची किंमत केवळ दीड रुपया असताना व्यापारी लोक प्रत्येक खोके दीडशे रुपये देऊन विकत घेत आहेत, इतकेच नव्हे तर त्यांचा वायदेबाजार सुरू झाला आहे. व्यापारी वर्गाची ही लबाडी लक्षात येताच स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनने लगेच कारवाई सुरू केली. विणकरांनी नायलॉन विकत घेतल्यानंतर त्याची मोकळी खोकी असोसिएशनला परत केली पाहिजेत व अशी परत आलेली सर्वच्या सर्व खोकी स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनच्या अधिकाऱ्यासमक्ष नष्ट केली पाहिजेत असा स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनने असोसिएशनला आदेश दिला आहे.

## हिंदी तज्ज्ञ पाठविण्याची मागणी

छोटे उद्योगधंदे स्थापन करण्याच्या कामात वाकबगार असणाऱ्या हिंदी तज्ज्ञांना १२ देशांतून मागण्या आल्या आहेत. बहुतेक मागण्या संयुक्त राष्ट्र संघटनेमार्फत आल्या असून त्यात आर्थिक पहाणी करणाऱ्या आणि छोट्या उद्योगधंद्यांचा विकास करणाऱ्या तज्ज्ञांना विशेष मागणी आहे. मागणी करणारे बहुतेक देश आशिआ व आफ्रिका खंडांतील आहेत. भारत सरकारने अशा ४५ तज्ज्ञांची शिफारस केलेली आहे. सध्या ९ देशांत हिंदी तज्ज्ञ निरनिराळी कामे करीत आहेत. पूर्वी पाठविलेल्या ११ हिंदी तज्ज्ञांनी आपआपली कामे पूर्णही केलेली आहेत.

## केरळमधील लोखंडाची माती

केरळमध्ये लोखंडाच्या खनिजाचे साठे सापडले असून परदेशांतील तज्ज्ञ आणि उद्योगपती ह्यांचे लक्ष तिकडे गेले आहे. जपानमधील एका मोठ्या कंपनीचे कांही तज्ज्ञ केरळ राज्यात आले आहेत. खनिजाची तपासणी करण्यासाठी त्यांचे नमुने मोठ्या प्रमाणावर जपानला पाठविण्याची खटपट ते करीत आहेत. काही जपानी उद्योगपतींनी केरळमधील लोखंडाच्या खाणींचा विकास करण्याची तयारी दाखविली आहे. परंतु त्यांच्या मार्गात दोन अडचणी आहेत. केरळमधील अस्थिर राजकीय परिस्थिती तेजोभंग करणारी आहे. अशा परिस्थितीत लोखंडाच्या खाणीच्या विकासासाठी लागणारे फार मोठे भांडवल गुंतवावे की नाही, असा प्रश्न त्यांना पडला आहे.

## मोठ्या शहरांतील आवाजावर नियंत्रण हवे

औद्योगिक दृष्ट्या प्रगत झालेल्या अगर होत असलेल्या देशांतून मोठी शहरे अस्तित्वात येतात. उद्योगधंद्यांची पसरण योजनाबद्ध केली तर मोठ्या शहरांमुळे उत्पन्न होणारे अनेक प्रश्न टाळता येण्यासारखे आहेत. भारतामधील मोठ्या शहरांत जे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत त्यांत आवाज आणि गोंगाट हाही एक आहे. ह्या शहरांतून होत असणाऱ्या आवाजासंबंधी नॅशनल फिजिकल लॅबोरेटरीने एक तपासणी केलेली आहे. रात्रंदिवस होत असणाऱ्या ह्या आवाजामुळे नागरिकांवर खूप ताण पडतो आणि त्यांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होतो. दिल्ली, कलकत्ता व मुंबईसारख्या मोठ्या शहरांतील आवाज व गोंगाट एखाद्या एंजिनिअरिंगच्या कारखान्याइतका मोठा असतो; असा निष्कर्ष पाहणी मंडळाने काढला आहे. ह्या आवाजातील बराच मोठा भाग चाकावर चालणाऱ्या वाहनांच्या गतीमुळे होतो. रेल्वेची स्टेशने, कारखाने, छापखाने, विमानतळ, इत्यादींच्या जवळ राहणाऱ्या नागरिकांना तर कर्णभेदी आवाजाने नेहमीच कानठळ्या बसत असतात. इमारतीतून राहणाऱ्या लोकांचे अशा आवाजापासून रक्षण करण्याच्या दृष्टीने इंडियन स्टँडर्डस् इस्टिट्यूशन लवकरच काही आचारसंहिता तयार करणार आहे. अमेरिकेसारख्या उद्योगप्रधान देशांतून शहरांतील आवाजापासून रक्षण करण्याचा विचार ह्या पूर्वीच चालू झाला आहे. विमानांच्या अगर मोटारगाड्यांच्या आवाजापासून त्रास होणार नाही, अशा प्रकारच्या भिंती बांधण्यासाठी नियम करण्यात आले आहेत. जुन्या शहरांतून आवाजविरोधी उपाय योजणे काहीसे अवघड आहे. परंतु नव्याने स्थापन होणाऱ्या औद्योगिक वसाहतीत आवाजाबद्दल दक्षता घेता येईल.

## अबू सिंबेल येथील देवळे हालविली

इजिप्तमध्ये रशियाच्या मदतीने आस्वान येथे नाईल नदीवर प्रचंड धरण बांधण्यात येत आहे. धरणात साठणाऱ्या पाण्यामुळे नदीच्या पात्राजवळ असलेली अबू सिंबेल येथील प्राचीन देवळे बुडून जाणार होती. खडकांत खोदलेल्या ह्या शिल्पकृती तेथून हलवून उंच जागी पुन्हा उभारण्याचा निर्णय संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सांस्कृतिक उपसंघटनेमार्फत घेण्यात आला. पण हे काम तांत्रिक दृष्ट्या अवघड आणि खूप खर्चाचे होते. अनेक देशांनी काम करण्यासाठी पैसा दिला म्हणूनच ते पूर्ण करता आले. त्यासाठी ३.६ कोटी डॉलर्स खर्च आला. शिल्पकृती हालविण्यासाठी त्यांचे वेगवेगळे तुकडे करवतींनी कापण्यात आले. त्यांपैकी कित्येक शिलाखंडांचे वजन ३० टनांइतके मोठे होते. असे सुमारे १,०४२ शिल्पखंड मूळच्या जागेवरून काढून उंच जागी नेण्यात आले व पुन्हा पहिल्यासारखे जोडण्यात आले.

## काश्मीरमध्ये अध्यात्म-चिंतनाचे केंद्र

आधुनिक शास्त्रीय शोधांमुळे सर्व जगातील समाजजीवन ढवळून निघाले आहे आणि निघत आहे. आध्यात्मिक विचारासाठी प्रसिद्धी पावलेला भारतासारखा देशही सामाजिक बदलाच्या ह्या लाटेतून सुटलेला नाही. युरोप-अमेरिकेसारख्या प्रगत देशातील माणसाची वृत्ती बहिर्मुख असते आणि भारतासारख्या पौर्वात्य देशातील माणसाची वृत्ती अंतर्मुख असते, असे सामान्यतः मानण्यात येते. अलीकडे मात्र आधुनिक उद्योगप्रधान देशातील लोकही अधिक अंतर्मुख होत चालल्याचे दिसत आहे. हृषीकेश येथील एका योग्याने परदेशात बराच प्रवास केला असता त्यालाही हा बदल आढळून आला म्हणून आता त्याने काश्मीरमध्ये अध्यात्म-चिंतनाची सोय करणारे एक केंद्र स्थापन करण्याचे ठरविले आहे. ह्या केंद्रात अनेक देशांतील चिंतनशील लोक अभ्यासासाठी येण्याची शक्यता आहे. दाल सरोवराच्याकाठी केंद्रासाठी जागा निवडण्यात आली आहे. केंद्राच्या कार्याला पुढील वर्षाच्या सप्टेंबरपासून प्रारंभ होईल. त्यात प्रथम ८४ लोकांना चिंतनाचे शिक्षण देण्यासाठी प्रवेश देण्यात येईल. परंपरागत भाषेत त्यांना साधक म्हणता येईल. केंद्राची स्थापना करणाऱ्या योग्याच्या माहितीप्रमाणे पश्चिम युरोपातील १ लाख लोकांनी तरी आध्यात्मिक चिंतनाची कास धरलेली आहे. पश्चिम जर्मनीत चिंतनाचे शिक्षण देणारी २०० तरी केंद्रे आहेत. चिंतनाचा विषय हा गूढवादात गुरफटलेला नसून चिंतनामुळे आध्यात्मिक प्रगतीला मदत होते. शिवाय लौकिक जगातील व्यवहार आणि आध्यात्मिक चिंतन ह्यांच्या दरम्यान विरोध असण्याचे कारण नाही, असे केंद्र संस्थापकाचे म्हणणे आहे.

## रंगीत चित्रवाणीपासून किरणोत्सर्ग

अमेरिकेत चित्रवाणीचा प्रसार खूप झालेला आहे. साधारणपणे मध्यम उत्पन्नाच्या गटातील कोणाही नागरिकाकडे चित्रवाणीचा सेट असतोच. काळ्यापांढऱ्या चित्रांप्रमाणेच रंगीत चित्रवाणी दाखविणारे सेट्सही आहेत. अमेरिकन मुलांवर चित्रवाणीतील दृश्यांचा वाईट परिणाम होतो असे समाजशास्त्रज्ञ सांगत आहेत. तथापि, अमेरिकेच्या आरोग्यखात्याने रंगीत चित्रवाणीपासून निर्माण झालेल्या एका नव्या धोक्याकडे लक्ष वेधले आहे. रंगीत चित्रवाणी आरोग्याला बाधक अशा किरणांचे उत्सर्जन करते असे आढळून आले आहे. अशा किरणांचा प्रेक्षकांच्या आरोग्यावर अर्थातच वाईट परिणाम होतो. प्रेक्षकांच्या लैंगिक जीवनावर ह्या किरणांचा दीर्घ कालांतराने का होईना पण अनिष्ट परिणाम होतो. सर्वच सेट्सची उत्सर्जनशीलता सारखी असते असे मात्र नाही. रंगीत चित्रवाणीचे बहुतेक सेट्स आता बाजारातून काढून घेण्यात आले आहेत.


## हाँगकाँगमधील हिंदी समाजाचे चित्र

हाँगकाँगची वसाहत ब्रिटिशांनी १८४० साली स्थापन केली. त्यानंतर तेथे हळूहळू हिंदमधील गरीब लोक पोटापाण्याच्या निमित्ताने जाऊ लागले. भारतात १८५७ सालचे 'बंड' झाल्यावर अधिक शांतताप्रिय म्हणून हिंदूंना तिकडे जाण्यास प्रोत्साहन देण्यात येऊ लागले. तथापि मुसलमानांची भारतामधील सत्ता नाहीशी झाल्याने दरिद्री मुसलमानही हाँगकाँगमध्ये येऊ लागले. प्रथम आलेले हे हिंदु-मुसलमान तेथेच स्थायिक झाले; त्यांनी चिनी स्त्रियांशी विवाहही केले. त्यांच्या पुढच्या पिढ्यांना तर भारताची आठवण सुद्धा होत नाहीशी झाली. तेथेच जन्म पावलेल्या अशा हिंदी लोकांची संख्या सुमारे ३ हजार आहे. अर्थात त्यांचे राहणीचे मान त्यांच्या पूर्वजांच्या मानाने खूपच सुधारले आहे. हाँगकाँगमध्ये आलेले सर्वच लोक गरीब होते असे मात्र नाही. काही श्रीमंत हिंदी कुटुंबेही तेथे गेली आणि त्यांनी तेथे व्यापार-धंदा सुरू करून चांगला जम बसविला. ही कुटुंबे बहुधा बोहरी मुसलमानांची होती. ह्या लोकांवर ब्रिटनमधील जीवनाचा विशेष पगडा असून ते ब्रिटनचे चहाते आहेत. मुसलमानांप्रमाणेच शीख लोकही हाँगकाँगमध्ये स्थायिक झाले आहेत. बहुतेक शीख दारवानांचे व पहारेकऱ्यांचे काम करीत असतात. हाँगकाँगमध्ये सर्वांत नवीन आलेले लोक म्हणजे सिंधी व्यापारी. भारताची फाळणी झाल्यावर सिंधी व्यापाऱ्यांनी पाकिस्तान सोडले आणि ते भारतात आले. त्यांच्यापैकी काही हाँगकाँगलाही आले. बहुतेक सिंधी श्रीमंत आहेत. ते राजकारणात लक्ष घालीत नाहीत. हाँगकाँगमधील हिंदी लोकांत त्यांचे प्रमाण ७५ ते ८० टक्के आहे. कौलून येथे ३०० सिंधी दुकाने आहेत. त्याशिवाय २५० सिंधी कंपन्या निर्यात व्यापारात गुंतलेल्या आहेत.

## शस्त्रास्त्रांच्या निर्मितीत स्वयंपूर्णता

भारतीय शस्त्रसज्ज दलांना परदेशी शस्त्रास्त्रांवर अवलंबून राहावे लागू नये म्हणून जारीने प्रयत्न करण्यात येत आहेत. १९६२ च्या चीनच्या आक्रमणानंतर आणि १९६५ च्या पाकिस्तानच्या आक्रमणानंतर ह्या प्रयत्नांना विशेष गती प्राप्त झाली आहे. आधुनिक प्रकारची विविध प्रकारची शस्त्रे बनविण्याच्या बाबतीत भारत लवकरच स्वयंपूर्ण होईल. सध्या देशातील शस्त्रास्त्रांच्या कारखान्यांतून दरसाल जवळजवळ १५० कोटी रुपये किमतीची शस्त्रास्त्रे तयार करण्यात येतात. हलकी शस्त्रास्त्रे तयार करण्याच्या बाबतीत भारत स्वयंपूर्ण झालाच आहे. अशा प्रकारची शस्त्रास्त्रे आशिआ व आफ्रिकेतील देशांना पुरविण्याइतके उत्पादन आता होऊ लागले आहे. औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या युरोपीय देशात शस्त्रास्त्रांची कारखानदारी एक मोठा धंदा होऊन बसला आहे.

महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा.
४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्ट
कपल्ड.

शिवाय बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

**– न्यू विजय इंडस्ट्रीज लि. –**
विश्रामबाग – सांगली (महाराष्ट्र)

शेती आणि लघु उद्योगधंदे
यांचे विकासासाठी
सदैव अग्रेसर

# दि युनायटेड वेस्टर्न बँक लिमिटेड

मुख्य कचेरी सातारा

शाखा एकोणतीस

औरंगाबाद येथे
लवकरच नवीन शाखा
सुरू होत आहे.

# सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक

फोन नं. :- ३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार – सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

# महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
## मुंबई

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

| : मुख्य कचेरी : | : विभागीय कचेरी : |
|---|---|
| १, बँक हाउस लेन, फोर्ट, मुंबई. | महाल नागपूर. |

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... रु. | ६,१३,४५,००० |
| गंगाजळी व फंड | ... रु. | ५,७२,४२,००० |
| ठेवी | ... रु. | ५०,९५,६३,००० |
| खेळते भांडवल | ... रु. | १,०६,६५,९६,००० |

: बृहन् मुंबईतील शाखा :


( १ ) भायखळा ( २ ) गोरेगाव ( ३ ) खार ( ४ ) लालबाग ( ५ ) प्रभादेवी ( ६ ) विलेपार्ले (पूर्व) ( ७ ) सांताक्रुझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम)

: नागपूर विभागातील शाखा :

(१) सिताबर्डी (२) धरमपेठ (३) धन्तोली (४) सदर बझार.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

डॉ. वा. वु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर.    श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.




हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व ' दुर्गाधिवास ' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.